# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ६१ शनिवार दि.०६ सप्टेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# कारवाई थांबविणे लज्जास्पद

मुंबई : सोलापूरमध्ये करमाळ्याच्या महिला आयपीएस अधिकारी डीएसपी अंजली कृष्णा आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात फोन आणि व्हीडीओ कॉलवरून जोरदार वाद सुरू झाला असून काँग्रेससह विरोधकही आक्रमक झाले आहेत. उपमुख्यमंत्र्यांना शासकीय कारवाई थांबविण्याचा अधिकार नसून अशाप्रकारची धमकी देणे लज्जास्पद असल्याची टीका काँग्रेसने केली आहे.

डीएसपी अंजली कृष्णा रस्ते बांधकामासाठी बेकायदेशीर वाळू उत्खननाच्या तक्रारीवर कारवाई करण्यासाठी गेल्या असता या संदर्भात राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्याने थेट अजित पवार यांना फोन केल्याने हा गोंधळ निर्माण झाला आहे. या सर्व प्रकरणाचे व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे. त्यामुळे या प्रकरणातील कारवाईकडे आता सर्वांचेच लक्ष लागले आहे.

काँग्रेसचे नेते सचिन सावंत यांनी देखील यावरुन अजित पवार यांच्यावर टीका केली आहे. त्याच वेळी, डीएसपी अंजली कृष्णा, तहसीलदार आणि प्रांताधिकारी यांनी या घटनेवर कोणतेही वक्तव्य केलेले नाही. या प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचे सांगितले जात आहे.कार्यकर्त्यांना संरक्षणासाठी दादागिरी या संदर्भात काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी अजित पवार यांच्यावर टीका केली आहे. एका पोस्टमध्ये ते म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा आपल्या कार्यकर्त्याला संरक्षण देण्यासाठी आयपीएस अधिकारी अंजना कृष्णा यांना केलेला फोन आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे केली गेलेली सारवासारव दोन्ही योग्य नाही. कोणतीही कारवाई थांबवण्याचा उपमुख्यमंत्र्यांना अधिकार नाही. दुसरीकडे यातून प्रशासनाला चुकीचा संदेश जातो. अशाच घटनेसंदर्भात अगोदर राज्य सरकारला सर्वोच्च न्यायालयाने १० लाखांचा दंडही ठोठावला होता. त्यावेळी विरोधी पक्षांनी फार बोंबाबोंब करुन राजीनामाही मागितला होता. आता दोन न्याय कसे होऊ शकतात? मुख्यमंत्र्यांनी यांचे उत्तर दिले पाहिजे. वेल डन कृष्णा ताई : अंबादास दानवे अंबादास दानवे यांनी देखील या संदर्भात अजित पवारांवर टीका केली आहे. ते म्हणाले की शिस्तीचा नेता म्हणून ओळखले जाणारे उपमुख्यमंत्री अजित पवार आपले कर्तव्य करू पाहणा-या महिला अधिका-याला कसे झापतात पहा! ते ही शासकीय काम करणा-या लोकांवर धावून जाणा-या लोकांची बाजू घेऊन. हे असे असेल तर पवार पालकमंत्री असलेल्या बीड जिल्ह्याचे भविष्य अंधारातच वाटते!

# दयानंद कला महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. संदीपान जगदाळे 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५' ने सन्मानित

### शिक्षकांचे योगदान भारताला सुपर पॉवर बनवेल - राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

नवी दिल्ली/लातूर, ५ : शिक्षकांचे समाजातील स्थान सर्वोच्च असून शिक्षक मुलांमध्ये आत्मसन्मान आणि सुरक्षितता जागवतात. त्यांचे यश हेच शिक्षकांचे खरे बक्षीस आहे. राष्ट्रीय शिक्षा धोरण २०२० च्या अंमलबजावणीत शिक्षणाला आनंददायी बनवण्यावर भर देत बालिका शिक्षणाला प्राधान्य देण्यात येत आहे. भारताला कौशल्याची राजधानी आणि सुपर पॉवर बनवण्यात शिक्षकांची भूमिका निर्णायक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त विज्ञान भवन येथे आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते महाराष्ट्रातील सहा शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यामध्ये शालेय शिक्षण क्षेत्रातील डॉ. शेख मोहम्मद वक़िउद्दीन शेख हमीदोद्दीन (जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धापूर, नांदेड), सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई) आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे (दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, लातूर), डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई), प्रा. पुरुषोत्तम पवार (एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंग, बारामती), आणि कौशल्य विकास क्षेत्रातील श्री. अनिल रामदास जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर) यांचा समावेश आहे.

शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागातर्फे आयोजित या सोहळ्यात ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण आणि १६ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांत मजूमदार, जयंत चौधरी, शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे (चडऊए) सचिव देबाश्री मुखर्जी यावेळी उपस्थित होते.

या पुरस्काराचा उद्देश शिक्षकांचे समर्पण, नाविन्यपूर्ण कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा गौरव करणे हा आहे. मागील काही वर्षांपासून या पुरस्काराची व्याप्ती वाढवून उच्च शिक्षण तसेच कौशल्य विकास व उद्योजकता



मंत्रालयातील शिक्षकांनाही संधी देण्यात येत आहे.

दयानंद कला महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे यांच्याविषयी संक्षिप्त माहिती

संगीत विषयाचे प्राध्यापक असलेले डॉ. जगदाळे हे लातूरमधील पहिले राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते ठरले. तबलावादक आणि गायक म्हणून प्रसिद्ध असलेल्या जगदाळे यांनी गोंड आदिवासी वस्त्यांवर शिक्षण पोहोचवले, एचआयव्ही बाधित व अनाथ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले.

अंध विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपीतील संगीत पुस्तक तयार करणे हे त्यांचे विशेष योगदान आहे. कोविड काळात दूरदर्शन, रेडिओ आणि सोशल मीडियाद्वारे त्यांनी लोकगीते व पोवाड्यांच्या माध्यमातून जनजागृती केली. त्यांच्या लिखाणातील १३ संगीतग्रंथ परदेशातही प्रसिद्ध झाले आहेत.

या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांना प्रमाणपत्र, रौप्य पदक आणि ५० हजार रुपयांचे रोख बक्षीस प्रदान केले.

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटी, निमंत्रण तसेच निवेदने स्वीकारत साधला नागरिकांशी संवाद.



लातूर प्रतिनिधी: शुक्रवार दि. ५ सप्टेंबर राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था, संघटना सदस्य, काँग्रेस महाविकास आघाडी, मित्र पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यासोबतच लातुर शहर व परिसरातील नागरिकांची भेट घेत त्यांच्या अडीअडचणी, समस्या समजून जाणून घेतल्या, त्यांची निवेदने, तसेच निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना तात्काळ पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव समद पटेल, माजी महापौर दीपक सुळ, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हा. चेअरमन प्रमोद जाधव, उपसभापती सुनील पडीले, संचालक अनुप शेळके, लातूर तालुका काँग्रेसचे सुभाष घोडके, माजी नगरसेवक पप्पू देशमुख, प्रभाग १५ चे काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष राजकुमार कत्ते, लातूर जिल्हा शिक्षक काँग्रेसचे अध्यक्ष बाळासाहेब चव्हाण, राम देशमुख, व्यंकटेश पुरी, प्रा.सुधीर अनवले, प्रभाग १३ काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष विजय गायकवाड, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, विष्णुदास धायगुडे, दिनेश गोजमगुंडे, अवीरराजे निबाळकर, सचिन मस्के, दिलीप मोरे आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध सेलचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## राज्यातील ९३.५१ टक्के विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण; उर्वरित विद्यार्थ्यांच्या आधार पडताळणीसाठी विशेष शिबिरे

मुंबई, दि. ५ : राज्यातील दोन कोटी चार लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपैकी ९३.५१ टक्के विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण शालेय शिक्षण विभागामार्फत पूर्ण झाले आहे. राज्यातील सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढणे आणि आधार क्रमांकाच्या प्रमाणीकरणाकरीता विभागामार्फत आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. आता उर्वरित विद्यार्थ्यांची प्रमाणीकरण प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या (आधार)(UID-I) सहकार्याने विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

राज्यामध्ये इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची आधार नोंदणी करुन अशा आधारधारक मुलांची नोंद संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांमार्फत सरल प्रणालीअंतर्गत करण्यात येते. शिक्षण विभागाकडील विविध लाभाच्या योजनांचा लाभ सर्व पात्र विद्यार्थ्यांना देण्यासाठी देखील आधार क्रमांक प्रमाणीकरण आवश्यक आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाबाबत शासनाच्या १०० दिवसाच्या कृती कार्यक्रमामध्ये समावेश करण्यात आला असून विद्यार्थ्यांची आधार पडताळणी करण्याचे काम प्राधान्याने करण्याच्या सूचना क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. शिक्षण विभागाने प्रत्येक गटसाधन केंद्रावर दोन असे एकूण ८१६ आधार संच उपलब्ध करुन दिलेले आहेत. विविध माध्यमाच्या शाळांमधून विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढणे आणि आवश्यक दुरुस्ती दोन्ही कामे सध्या गटस्तरावर सुरू आहेत. तथापि, आधार प्राधिकरणामार्फत विद्यार्थ्यांच्या आधारकार्डवरील माहितीमध्ये विसंगती आढळून येत असल्यामुळे पडताळणी प्रलंबित राहत आहे.

राज्यातील विविध माध्यमांच्या शाळांमधून २ कोटी ४ लाख ६३ हजार ३९२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजीपर्यंत यापैकी १ कोटी ९१ लाख ३५ हजार २९६ विद्यार्थ्यांची नावे आधार प्राधिकरणाकडील माहितीशी जुळत असल्याने वैध ठरली आहेत. उर्वरित पाच लाख २७ हजार ६०२ विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड उपलब्ध नाहीत. तर, ६३ हजार ००९ विद्यार्थ्यांची आधार पडताळणी प्रलंबित आहे. तसेच, ७ लाख ३७ हजार ४८५ विद्यार्थ्यांचे आधार अवैध ठरले आहेत. बालकांचे पाचव्या वर्षी व पुन्हा पंधराव्या वर्षी आधार बायोमेट्रिक अद्ययावत करणे आवश्यक असल्याने भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्याकरिता विशेष मोहीम राबविण्याची सूचना केली आहे. तसेच सर्व शाळांनाही आवाहन करण्यात आले आहे. याकरिता प्राधिकरण व शिक्षण मंत्रालयाने संयुक्त उपक्रम राबवत 'युनिफाइड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर एज्युकेशन प्लस' (UDISE+) या प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांच्या आधार बायोमेट्रिक अपडेटची स्थिती उपलब्ध करून दिली आहे. या प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांची आधार प्रमाणित माहिती यापुढे बंधनकारक असून त्याचा उपयोग विविध योजना व विद्यार्थी लाभांशी जोडण्यात येणार आहे. तसेच छएएढ, गएए, CUFT यासारख्या स्पर्धा व विद्यापीठ परीक्षांमध्ये नोंदणी करताना विद्यार्थी व त्यांच्या पालकांना अडचणी येऊ नयेत याकरिता वेळेत बायोमेट्रिक अपडेट करणे महत्त्वाचे असल्याचे प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे. आधार अद्ययावत करणे ही प्रक्रिया शाळांमधून शिबिरांच्या माध्यमातून अधिक वेगाने पूर्ण होऊ शकते. या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागामार्फत शालेय शिक्षण आयुक्तांना आधार प्राधिकरणाच्या मदतीने राज्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात शिबिरे आयोजित करण्यात यावीत आणि आधारची नोंदणी व आधार अद्ययावत करणे याबाबत सर्व संबंधितांना आवाहन करण्यात यावे असे कळविले आहे. यामुळे राज्यातील उर्वरित विद्यार्थ्यांची आधारशी संबंधित माहिती संलग्नित करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाच्या माहितीमधील विसंगती, त्यामधील त्रुटी/तफावत दूर करून आधार क्रमांक वैध करण्यासाठी व त्याकरिता येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी या विशेष मोहिमांमध्ये आधार प्राधिकरणाची नक्कीच मदत होणार आहे.

## महिला अधिकाऱ्यावर 'दादागिरी'ची भाषा; अखेर अजित पवारांनी मौन सोडलं



सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्याच्या पोलीस उपअधिक्षक अंजना कृष्णा आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यातील संवादाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या व्हिडीओत कारवाई थांबवा, मी तुम्हाला आदेश देतो असे म्हणत अजित पवार यांनी दादागिरीची भाषा महिला पोलीस अधिकाऱ्याला केल्याने विरोधकांकडून त्यांच्यावर टीका केली जात आहे.

अशातच आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूर जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांसोबतच्या संवादाच्या संदर्भात समाजमाध्यमांवर प्रसारित होत असलेल्या व्हिडिओंबाबत स्पष्टीकरण दिलं आहे. त्यांनी ठामपणे सांगितलं की, माझा उद्देश कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये हस्तक्षेप करणं नव्हता, तर घटनास्थळी परिस्थिती शांत ठेवणं आणि ती आणखी चिघळू नये याची काळजी घेणं हा होता.

पुढे म्हणाले की, आपल्या पोलीस दलाबद्दल तसंच धैर्यानं आणि प्रामाणिकपणे आपलं कर्तव्य बजावणाऱ्या महिला अधिकाऱ्यांबद्दल मला सर्वोच्च आदर आहे. माझ्यासाठी कायद्याचं राज्य हेच सर्वात महत्त्वाचं आहे. मी पारदर्शक प्रशासकीय कारभारासाठी आणि बेकायदेशीर वाळू, माती, खडक उपशासह प्रत्येक बेकायदेशीर कृतीवर कायद्याप्रमाणे कठोर कारवाई करण्यासाठी कटिबद्ध आहे, असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे.

अजित पवार इतरांना कायदा शिकवात, मग तुम्ही काय करता? संजय राऊत राज्याचा उपमुख्यमंत्री असलेला माणूस आयपीएस अधिकाऱ्याला बेकायेदशीर कामांना पाठिंबा द्या म्हणून सांगतोय, मी सांगतोय ते बेकायदेशीर काम कर असे ते सांगताहेत. आणि हेच अजित पवार इतरांना कायदा शिकवात, मग तुम्ही काय करता? असा खडा सवाल राऊतांनी अजित पवारांना विचारला आहे.

तुम्ही सगळे चोरांचे सरदार आहात अशी जहरी टाकाही राऊतांनी केली आहे. तुम्ही महाराष्ट्र राज्य हे चोरांचं राज्य केलं आहे, महाराष्ट्राच्या उत्तम प्रशासनाला तुम्ही भ्रष्टाचाराची कीड लावताय. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी अर्धा महाराष्ट्र लुटला असा घणाघातही राऊतांनी केला आहे.

## GST कपातीनंतर सोनं स्वस्त की महाग, किती टक्के जीएसटी लागणार? ; वाचा आजचा भाव काय ?

दिल्लीत जीएसटी कौन्सिलची ५६ वी महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत ५ टक्के आणि १८ टक्के या दोनच जीएसटी दरप्रणालीला मंजूरी देण्यात आली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी याबाबत माहिती दिली. या बैठकीत अनेक वस्तूंवरील कर देखील कमी करण्यात आले तर काही वस्तू शून्य कर रचनेत आणल्या गेल्या आहेत. या सर्वामध्ये सोन्याच्या दागिन्यांवर आता नेमका किती लागणार हे जाणून घेण्यासाठी लोकांमध्ये उत्सुकता दिसून येत आहे. सोन्याच्या किमतीत वाढ सुरूच आहे. सप्टेंबरच्या सुरुवातीपासूनच सोन्याच्या किमतीत प्रचंड वाढ झाली आहे. येत्या काळात सोने आणखी महाग होण्याची भीती असल्याने लोक दिवाळी आणि दसरा यासारख्या मोठ्या सणांपूर्वी खरेदी करत असल्याचे बाजारातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे. सोन्याच्या दरात आता सध्या तरी कोणताही कर कमी करण्यात आला नसून यामध्ये पूर्वीप्रमाणेच ३ आणि ५ टक्केच कर लागू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. म्हणजेच सोने आणि चांदीवर ३ टक्के जीएसटी आणि दागिने बनवण्याच्या शुल्कावर ५ टक्के जीएसटी लागू राहील. आज म्हणजेच ५ सप्टेंबर २०२५ रोजी देशभरात २४ कॅरेट सोने १,०७,६२० रुपये प्रति १० ग्रॅम दराने विकले जात आहे. त्याच वेळी, २२ कॅरेट सोने ९८,६५० रुपये आणि १८ कॅरेट सोने ८०,७२० रुपये दराने व्यवहार करत आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की सामान्यतः २४ कॅरेट सोने गुंतवणूकीसाठी खरेदी केले जाते. तर दागिन्यांसाठी २२ आणि १८ कॅरेट सोन्याची मागणी सर्वाधिक असते. तुमच्या शहरातील किंमती जाणून घ्या आज दिल्लीत २४ कॅरेट सोने १,०७,७७० रुपये प्रति १० ग्रॅम दराने विकले जात आहे. त्याच वेळी, २२ कॅरेट सोने ९८,८०० रुपये आणि १८ कॅरेट सोने ८०,८४० रुपयांना व्यवहार करत आहे. त्याचप्रमाणे, मुंबई, चेन्नई, कोलकाता, बेंगळुरू, हैदराबाद, केरळ, पुणे, कोइम्बतूर, मदुराई, विजयवाडा, नागपूर आणि भुवनेश्वर येथे २४ कॅरेट सोने १,०७,६२० रुपये प्रति १० ग्रॅम, २२ कॅरेट सोने ९८,६५० रुपये आणि १८ कॅरेट सोने ८०,७२० रुपयांना उपलब्ध आहे. वाढ का होत आहे? सोन्यासोबतच चांदीच्या किमतीतही वाढ दिसून येत आहे. आज देशभरात चांदी १,४१,२०० रुपये प्रति किलोवर व्यापार करत आहे आणि त्यात १,४१० रुपयांची वाढ झाली आहे. दिल्ली आणि मुंबईसह सर्व प्रमुख शहरांमध्ये चांदीची किंमत जवळजवळ समान पातळीवर आहे.



# संपादकीय

## आर्थिक सुधारणांचा बूस्टर

भारतातील जीएसटी कौन्सिलने या सप्टेंबरमध्ये घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयामुळे कर रचना पूर्णपणे बदलली आहे. १२ टक्के आणि २८ टक्के अशा दरांची पायरी संपुष्टात आणून फक्त ५ टक्के आणि १८ टक्के हे दोन मुख्य दर ठेवण्यात आले आहेत, तर जीवनावश्यक वस्तूंना करमुक्तकरण्यात आले आहे. विमा, औषधे, दैनंदिन उपभोग्य वस्तू आणि ग्राहक टिकाऊ माल या सर्वांवर मोठा दिलासा देणारी कपात झाली आहे. या कर सुधारणांच्या माध्यमातून आपली अर्थव्यवस्था अधिक मजबूत, ग्राहककेंद्रित आणि धक्क्यांना तोंड देणारी बनविण्याचा मार्ग स्वीकारला आहे. जागतिक बाजारपेठेत अस्थिरता, पुरवठा साखळीतील अडथळे आणि राजकीय तणाव अशा अनेक घटकांमुळे विकसनशील देशांना स्वतःच्या सामर्थ्यावर उभे राहणे भाग आहे. या संदर्भात जीएसटी २.० हा आत्मनिर्भरतेकडे टाकलेला एक महत्त्वाचा टप्पा ठरतो.

सागर शहा, सीए भारतीय कर प्रणालीतील सर्वात मोठी सुधारणा मानल्या जाणार्या वस्तू व सेवा कराला आठ वर्षे पूर्ण होत असताना केंद्र सरकारने २०२५ मध्ये एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या कर संरचनेतील गुंतागुंत दूर करून केवळ दोन मुख्य स्लॅब ५ टक्के आणि १८ टक्के लागू करण्याचा निर्णय जीएसटी कौन्सिलने घेतला आहे. या बदलासोबत जीवनावश्यक वस्तूंना, कृषी उत्पादनांना, औषधांना व आरोग्य–शिक्षणाशी निगडित सेवांना करमुक्त श्रेणीत आणण्यात आले आहे. दुसरीकडे 'सिन गुडस्'वर ४० टक्के दर लागू करण्यात आला आहे.

या सुधारणांचा उद्देश फक्त कर कपात करणे एवढाच नाही, तर एक सुसंगत, पारदर्शक व सुलभ कर प्रणाली निर्माण करणे हा आहे. यामुळे सामान्य नागरिकांचे रोजचे जीवन स्वस्त होईल, तर उद्योगधंद्यांना नियोजनशक्ती व जागतिक स्पर्धात्मकता मिळेल.

दैनंदिन वापरातील वस्तूंवरील जीएसटी दर कमी झाल्याने महागाईच्या दबावातून मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा मिळणार आहे. पनीर, भाकरी, गहू, तांदूळ यांसारख्या वस्तूंना करमुक्त श्रेणीत टाकण्यात आले आहे. केसाचे तेल, टूथब्रश, शॅम्पू यांसारख्या उपभोग्य वस्तूंवर कर फक्त ५ टक्के असेल. यामुळे उपभोग खर्चात कपात होईल व मागणी वाढेल. मागणीतील वाढ हीच उत्पादनवाढीची गुरुकिल्ली असल्याने अर्थव्यवस्थेला गती मिळण्यास मदत होईल. पूर्वी २८ टक्के कराच्या जोखडाखाली असलेले सिमेंट आता १८ टक्के स्लॅबमध्ये येत असल्याने रिअल इस्टेट क्षेत्रातील बांधकाम प्रकल्पांचा खर्च मोठ्या प्रमाणात घटणार आहे. याचा परिणाम घरांच्या किमती कमी होण्यात दिसून येऊ शकतो. ऑटोमोबाईल क्षेत्रात छोट्या वाहनांवर १८ टक्के दर निश्चित झाल्याने विक्री वाढण्याची शक्यता आहे. औद्योगिक क्षेत्रातील या सुधारणा रोजगारनिर्मितीला चालना देणार आहेत.

सर्वात मोठा दिलासा विमा क्षेत्राला मिळाला आहे. जीवन व आरोग्य विमा हप्ता आता पूर्णपणे करमुक्त झाला आहे. यामुळे सामान्य नागरिक विम्याच्या योजनांकडे अधिक उत्साहाने वळतील. आरोग्य विम्याचे कवच विस्तारल्याने देशातील सामाजिक सुरक्षा बळकट होईल. विमा कंपन्यांच्या समभागांमध्ये आधीच वाढ दिसून आली असून यामुळे वित्तीय क्षेत्रातील गुंतवणुकीला चालना मिळेल.

यंत्रसामग्री व खतांवरील दर कमी झाल्यामुळे शेतकर्यांच्या इनपुट खर्चात घट होईल. यामुळे शेतीतील उत्पादन क्षमता वाढेल व ग्रामीण खरेदी क्षमता सुधारेल. कृषी उत्पादनांवर जीएसटी लागू नसल्याने इनपुट टॅक्स क्रेडिटचा फायदा शेतकर्यांना मिळत नाही; मात्र कमी दरांमुळे उत्पादन खर्च नियंत्रणात येईल. याचा सकारात्मक परिणाम ग्रामीण बाजारपेठेतील मागणीवर होईल. उद्योग क्षेत्रातील 'इन्व्हर्टेड ड्युटी स्ट्रक्चर' दूर झाल्याने उत्पादन खर्चात पारदर्शकता येईल. आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांसाठी भारताचे कर पर्यावरण अधिक स्थिर व विश्वासार्ह होईल. अमेरिकेने लादलेल्या ५० टक्के आयात शुल्काच्या पार्श्वभूमीवर भारतात आंतरिक मागणी वाढवणे अत्यावश्यक होते. नव्या जीएसटी सुधारणा हाच उद्देश साध्य करतील.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात जीएसटीत मोठे बदल करण्याचे संकेत दिले होते. त्यानंतर झालेल्या या निर्णयामुळे केंद्र व राज्य यांच्यातील सहकार्य अधिक ठळक झाले आहे. वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी दीर्घ १२ तासांच्या बैठकीनंतर हा निर्णय सर्वानुमते घेतल्याचे सांगितले. ही सहमती सहकारी संघराज्यवादाची ताकद दाखवते.

विरोधकांनी मात्र याला 'जीएसटी २.० नव्हे, तर १.५' असे संबोधले असून राज्यांच्या महसुली नुकसान भरपाईला पाच वर्षांची मुदतवाढ मिळावी, ही मागणी अद्याप प्रलंबित असल्याचे ते अधोरेखित करतात; परंतु ग्राहक व उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष फायद्यांमुळे या सुधारणांचा सकारात्मक प्रभाव अधिक ठळकपणे दिसेल.

या सुधारणांमुळे मागणी वाढल्याने उद्योगांना उत्पादनवाढ करावी लागेल. यामुळे नवीन रोजगारनिर्मिती होईल. बांधकाम, वाहन, पर्यटन, एफएमसीजी, विमा, आरोग्य या क्षेत्रांना विशेष लाभ होणार असून ग्रामीण भागातील मागणीही वाढेल. उत्पादन क्षमता वाढल्याने देशाची जीडीपी वाढीची गती पुन्हा ८ टक्क्यांपेक्षा जास्त होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

कमी दरांमुळे भारतातील उत्पादनांची किंमत तुलनेने स्वस्त होईल. यामुळे जागतिक स्पर्धात्मक बाजारपेठेत भारतीय उत्पादकांना नव्या संधी मिळण्यास मदत होईल. तसेच निर्यात क्षमता वाढून परकीय चलनाचा ओघ वाढेल. पंतप्रधानांनी अधोरेखित केल्याप्रमाणे या सुधारणांमुळे 'आत्मनिर्भर भारता'च्या दिशेने ठोस पाऊल टाकले गेले आहे. देशांतर्गत उत्पादकांना प्रोत्साहन मिळाल्याने आयातीवरील अवलंबित्व कमी होईल. तज्ज्ञांच्या मते ४८,००० कोटी रुपयांचा महसुली परिणाम होणार असला, तरी तो देशांतर्गत मागणीतील वाढीमुळे वसूल होईल. वित्तीय बाजारांसाठी हा 'कंझम्प्शन रिव्हायव्हल बॉम्बशेल' ठरला आहे.

जीएसटी सुधारणा २०२५ या केवळ कर दरातील कपात नाहीत, तर भारतीय अर्थव्यवस्थेच्या पुढील दशकातील दिशादर्शक पाऊल आहेत. ग्राहकांना दिलासा, उद्योगांना गती, विमा–आरोग्य क्षेत्राचा विस्तार, रोजगार व उत्पादन क्षमतेत वाढ, गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास आणि सहकारी संघराज्यवादाचे बळकटीकरण या सर्वांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला नवे पंख लाभतील, यात शंका नाही. या सुधारणा योग्यवेळी नवरात्र व दिवाळीच्या खरेदी हंगामाआधी लागू होत असल्याने त्याचा परिणाम अधिक ठळकपणे जाणवेल. सामान्य नागरिकांच्या हातात जादा पैसा येईल, तो खर्च वाढवेल आणि खर्चवाढच शेवटी उत्पादन, रोजगार व अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण वाढीला चालना देईल. आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आत्मनिर्भरतेचा ध्यास धरणे आवश्यक बनले आहे.

# आपली भावी पिढी गंजाडी होणार

आपल्या राज्यामध्ये विविध प्रकारचे व्यसन करणारे लोक आहेत .जसे की, दारू पिणे, गुटखा खाणे, सिगारेट ओढणे, बिडी ओढणे, तंबाखू खाणे, ड्रग यासारखे अमली पदार्थ पण याच बरोबर सर्वात गांजा पिणाऱ्या लोकांचे सर्वत्र पेव फुटलेले आहे. कारण गांजा पिणाऱ्या लोकांची संख्या जास्त असल्यामुळे विविध ठिकाणी पोलिसांचे मार्फत गांजा पकडला जात आहे. याच्या ताज्या बातम्या वाचनात आलेल्या आहेत. त्या अशा आहेत

* दोन किलो गांजासह तिघेजण जाळ्यात. पुणे : कार मध्ये बेकायदेशीरपणे गांजा बाळगल्या प्रकरणी उत्तमनगर पोलिसांनी तिघांना अटक केली.

या कारवाईत पोलिसांनी ७० हजार रुपये किमतीचा २.१४३ किलोग्रॅम गांजा आणि दोन लाखाची कार जप्त केली आहे. रवींद्र लक्ष्मण ढेबे ( वय वर्ष २१), अभिषेक विकास मारणे (वय वर्षे २३) दोघे राहणार कारले चौक नांदेड गाव) आणि सुरज ज्ञानेश्वर मरगळे (वय वर्ष २१ राहणार धनगर वस्ती नांदेड गाव ) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलीस हवालदार राजाराम हनुमंत पारेकर यांनी फिर्याद दिली आहे. पुढील तपास उत्तमनगर पोलीस करत आहेत. ही पुणे येथील बातमी असली तर शेजारच्या करमाळा येथे तर पोलिसांनी सिनेस्टाईलने पाठलाग करून गांजा बाळगणाऱ्यांना पकड आहे. त्याची बातमी अशी आहे .

* वाहनांचा पाठलाग करत लाखोंच्या गांजा जप्त. करमाळा पोलिसांची कारवाई दोन वाहनासह तिघेजण ताब्यात. करमाळा : करमाळा पोलिसांनी दोन वाहनांचा फिल्मी स्टाईलने पाठलाग करत तालुक्यातील केम ते कंदर रस्त्यावर लाखोंचा गांजा जप्त केला आहे. मंगळवार दिनांक २ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली आहे. याबाबत पोलिस निरीक्षक रणजीत माने यांनी सांगितले आहे की ,पोलीस उपनिरीक्षक सुशीलकुमार पाखरे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दिनांक २ सप्टेंबर २०२५ रोजी केम कडून कंदरकडे जाणाऱ्या रस्त्यावर संशयितरित्या एक विना नंबरची स्विफ्ट कार व एक विना नंबरची ऍक्टिवा स्कूटरला पोलिसांनी थांबवण्याचा इशारा केला.

यावेळी ते न थांबल्यामुळे पोलिसांनी त्यांचा पाठलाग सुरू केला. कंदर हद्दीतील विजय नवले यांच्या घराकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्याने जात असताना सायंकाळी पाचच्या सुमारास पोलिसांनी दोन्ही वाहनांना घेरले .यावेळी सचिन नागनाथ निचळ (वय वर्षे २६ ) हा चालवीत असलेल्या एक्टिवा स्कूटरच्या डिकीत चिकटपट्टीने पॅक केलेले एक पाकीट तर त्याच्या पाठीमागे असलेल्या स्विफ्ट कारमधील आकाश उर्फ सोन्या उत्तरेश्वर गोसावी (वय वर्ष २६) व त्याच्या सोबत असलेल्या सचिन सुरेश बावळे ( वय वर्षी ४० तिघे राहणार वेणेगाव तालुका माढा जिल्हा सोलापूर ) यांच्याकडे कारचे डिक्कीत चिकटपट्टीने पॅक केलेले पाच पाकीट मिळून आले .

पंचासमक्ष पाहणी केली असता पोलिसांना या सहा पाकिटामध्ये ३ लाख ३६ हजार २५० रुपये किमतीचा एकूण १३ किलो ४५० ग्रॅम गांजा असल्याचे दिसून आले. करमाळा पोलिसांनी या तिघाकडे गांजा एक्टिवा स्कूटर किंमत ७५ हजार रुपये व स्विफ्ट कार किंमत ४ लाख रुपये असे एकूण ८ लाख ११ हजार २५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलीस नाईक मनीष पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून करमाळा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस उपनिरीक्षक सुशीलकुमार पाखरे हे पुढील तपास करत आहेत.

तपासादरम्यान सदर गुन्ह्यातील संशयित आरोपी आकाश उर्फ सोन्या उत्तरेश्वर गोसावी याच्या विरुद्ध टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे ४ तर मंद्रूप पोलीस स्टेशन येथे १ असे पाच गुन्हे विविध कलमान्वये दाखल असल्याचे समोर आले आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.अशा प्रकारच्या बातम्या कमी की काय म्हणून आजच कुर्डूवाडी येथील सर्वात जास्त रुपयांचा गांजा पकडलेला आहे. त्याची बातमी अशी की,

* कुर्डूवाडी १४ लाखाचा गांजा जप्त ; आरोपी ताब्यात. कुर्डूवाडी : कुर्डूवाडी ( तालुका माढा ) येथे पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात १३ लाख ९० हजार ३२० रुपयाचा उग्र वासाचा मादक पदार्थ गांजा जप्त केला आहे .

या कारवाई दरम्यान एका आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतले आहे . याबाबत नाईक विजय भारत घोगरे ( वय वर्षी ३६, नेमणूक कुर्डूवाडी पोलीस ठाणे )यांनी फिर्याद दाखल केली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की ,उपभागीय पोलीस अधीक्षक अंजनी कृष्णा यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे मंगळवार दिनांक २ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास शहरातील पटेल चौक माढेश्वरी बँकेच्या टेरेसवर असलेल्या स्लॅबच्या खोलीवर पोलिसांनी छापा टाकला. यावेळी संशयित आरोपी अजिनाथ उर्फ महाराज नागनाथ वाघमोडे (वय वर्ष ४५ राहणार पटेल चौक कुर्डूवाडी ) मुद्देमालासह मिळून आला आहे.

यात एकूण पाच गोण्या आढळून आल्या. त्या गोण्यावर पशुखाद्याच्या विविध गोण्यांमध्ये १७.१२५ किलोग्रॅम ( ३ लाख ४२ हजार रुपये), ९.३७९ किलोग्रॅम १ लाख ८७ हजार रुपये), ९.५८२ किलोग्रॅम (१ लाख ९१ हजार ६४० रुपये ) , १८.२०५ किलोग्रॅम ( ३ लाख ६४ हजार १०० रुपये ) ,१५.२४० किलोग्रॅम ३ लाख ४ हजार ८००) अशा एकूण पाच गोणीत १३ लाख ९० हजार ३२० रुपयांचा गांजा जप्त केला आहे . पुढील तपास सब पोलीस निरीक्षक शिंदे हे करत आहेत. वरील तिन्ही ठिकाणच्या बातम्या वाचल्या नंतर आपल्या लक्षात आले असेल किती लोक गांजा पिणारे आहेत. या गांजा मुळे तुम्ही आम्ही लोक खेदाने म्हणतील आपली भावी पिढी गंजाडी होणार

*************

लेखक
जी.एस.कुचेकर पाटील
भुईंज तालुका वाई जिल्हा सातारा
मो.न. ७५८८५६०७६१

# नवा राजकीय त्रिकोण

देवेंद्र–राज–उद्धव एक राजकीय त्रिकोण बनला आहे. देवेंद्र त्रिकोणाच्या वरच्या कोनावर बसून आहेत. खालच्या दोन कोनांवर उद्धव आणि राज ठाकरे आहेत. देवेंद्र आपली सत्ता मजबूत करण्यासाठी राज यांचा वापर करत आहेत असं वाटतं.

आपले बंधू उद्धव ठाकरेंना निशाणा करत सुमारे दोन दशकांपूर्वी राज ठाकरेंनी शिवसेनेशी फारकत घेतली. तेव्हापासून गेल्या महिन्यात पाच जुलैला त्याच उद्धव ठाकरे यांच्या बरोबर हिंदी भाषा सक्तीची न करण्याच्या मुद्द्यावर विजयी मेळावा घेताना राज त्याच ठिकाणी परत आले जिथून त्यांनी फारकत घेतली होती. त्यांची सर्वात वादग्रस्त ठरलेली भूमिका होती जेव्हा २०१९ साली त्यांनी 'लाव रे तो व्हिडिओ' म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विरूद्ध प्रचाराची राळ उडवून दिली होती. वारंवार बदलत्या भूमिकेत राज पुन्हा त्याच जागी वापस आले होते ज्यांच्या नेतृत्वक्षमतेवर त्यांनी प्रश्न उपस्थित केले होते.



बाळासाहेब ठाकरे यांना मानणार्या एका मोठ्या वर्गाला या दोन नेत्यांनी हातमिळवणी करावी अशी अपेक्षा होती. कारण दोन्ही नेते शिवसेनाप्रमाणेच महाराष्ट्राच्या हिताविषयी, मराठी माणसाच्या प्रश्नांबद्दल बोलणारे आहेत. त्यांचा स्वभाव, राजकारणाची शैली वेगळी असली तरी एकत्र आल्यास शिवसेनेचे विखुरलेले मत पुन्हा एकत्र होण्याची शक्यता होती. ते अखेर घडलं होतं. आगामी महापालिका निवडणुकीत दोन भाऊ एकत्र येऊन ७५ हजार कोटी रुपयांचं बजेट असणार्या मुंबईच सुकाणू ठाकरे घराण्याच्या हातातच राहील अशी भाकिते केली जाऊ लागली. त्यासाठी उद्धव त्यांना मुख्यमंत्री पद देणार्या काँग्रेसलाही समजावून सांगण्यास तयार होते.

पण कुठेतरी माशी शिंकली. त्रिकोणातील वर बसलेला कोन जागा झाला आणि राज ठाकरे गेल्या आठवड्यात मुंबईतील कार पार्किंगच्या अतिशय महत्त्वाच्या (?) मुद्द्यावर आपली मते व्यक्त करण्यासाठी आपल्या लवाजम्यासह चक्क वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचले. हेही कमीच की काय म्हणून पाठोपाठ त्यांचे चिरंजीव अमित चक्क आशिष शेलार यांना भेटले. विषय होता सणासुदीच्या काळात परीक्षा न ठेवण्याचा. हे शेलार तेच ज्यांनी आता राज ठाकरेंच्या पाच जुलैच्या भाषणावर टीका केली होती. या दोन्ही भेटी केवळ पार्किंग आणि परीक्षा या विषयापुरत्याच मर्यादित असतील असं वाटत नाही. या दोन्ही भेटीत बरंच पाणी मुरलं आहे. या भेटीमुळे उद्धव–राज युतीची शक्यता कमी झाली आहे, तर भाजपने आपले राजकीय गणित अधिक मजबूत केले आहे. राज ठाकरेंनी आपली भूमिका धरसोड वृत्ती कायम ठेवली आहे.

आता राज यांच्यापेक्षा हुकमी अल्पसंख्याक, दलित मते मिळवून देणारी काँग्रेस उद्धव ठाकरे यांना योग्य वाटणं साहजिकच आहे. त्यातच देशातील प्रत्येक प्रादेशिक पक्षाला एक तर भाजप किंवा काँग्रेसच्या पंखाखाली जाणं हे क्रमप्राप्तच आहे. आंध्र प्रदेशमध्ये चंद्राबाबू नायडू यांनी भाजपची साथ दिल्याने वायएसआर काँग्रेसचे जगन रेड्डी यांना इच्छा असो वा नसो काँग्रेसला साथ देणं क्रमप्राप्तच आहे. इंडिया आघाडीने तेलुगू बिड्डा उमेदवार उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत दिल्याने जगन रेड्डी काँग्रेसला साथ देतील. या घटनेनंतर उद्धव यांचा समर्थक वर्ग राज ठाकरे यांच्याकडे संशयाने पाहू लागला. तसेच काँग्रेस–राष्ट्रवादीसुद्धा उद्धव–राज युतीला मान्यता देतीलच याची खात्री नाही. त्यामुळे ही बैठक उद्धव ठाकरे यांच्यासाठी राजकीय दृष्टीने नक्कीच धोक्याची घंटा आहे.राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे भाऊ असूनही दीर्घकाळ राजकारणात प्रतिस्पर्धी राहिले. उद्धव ठाकरेंना विरोध करत राज यांची मनसे सुरुवातीला मराठी अस्मितेच्या मुद्द्यावर जोरदार उभी राहिली, पण काळानुसार पक्षाची ताकद कमी होत गेली.

राज आणि उद्धव एकत्र येतील, अशी चर्चा रंगत असतानाच फडणवीसांसोबत झालेली ही बैठक त्यांच्या समीकरणाला धक्का पोहोचवणारी आहे. उद्धव ठाकरे काँग्रेस–राष्ट्रवादीसोबत आघाडी टिकवून आहेत. त्यांनी केंद्रातील भाजप सरकारवर सातत्याने टीका केली आहे. अशा वेळी त्यांचा भाऊ राज ठाकरे जर भाजपच्या जवळ गेले, तर उद्धव–राज युतीची शक्यता जवळपास संपुष्टात येईल. राज भाजपबरोबर गेल्यास त्यांचा मराठी अस्मितेचा चेहरा धूसर होईल.अशा पार्श्वभूमीवर राज ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांची झालेली गुप्त किंवा 'क्लोज डोअर' बैठक अनेक प्रश्न निर्माण करते.

भाजपला मनसेची साथ हवी आहे का? किंवा उद्धव–राज युती होऊ नये यासाठी भाजप राज ठाकरे यांच्याशी आधीच गाठीभेट घेत आहे का? भाजपला पुढील लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लक्षात घेता आणखी काही मराठीवादी मतांची गरज आहे. मनसेकडे मतांचे फार मोठे बँक नाही, पण ठराविक भागात मनसेचा प्रभाव आहे. त्याशिवाय, राज ठाकरे यांची भाषणशैली आणि जनतेशी संवाद साधण्याची क्षमता भाजपसाठी उपयुक्त ठरू शकते. याच कारणामुळे भाजप राज ठाकरे यांना आपल्या जवळ ठेवू पाहत आहे, असे मानले जाते. यामुळे उद्धव–राज युती होण्याची शक्यता कमी करून भाजप एक प्रकारे 'डॅमेज कंट्रोल' करीत आहे. भविष्यात या बैठकीचा परिणाम लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत दिसेल. मनसेला काही राजकीय संजीवनी मिळेल का, की पक्ष पुन्हा भाजपच्या सावलीत विरघळून जाईल हे आगामी काही महिन्यांत स्पष्ट होईल. मात्र इतके नक्की की या बैठकीने उद्धव–राज युतीच्या स्वप्नाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे आणि महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे पुन्हा एकदा अनिश्चिततेकडे वळली आहेत.

# इथेनॉल अन् कंपनी मालामाल

केंद्रीय मंत्री पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याबाबत जी सातत्याने आणि आग्रही भूमिका मांडत आहेत, त्यावरून इथेनॉल मिश्रणासाठी त्याच्या पुरवठ्याचे मोठे काम विशिष्ट कंपनीला मिळाले आहे किंवा मिळण्याची ठाम शक्यता आहे, असे गृहित धरून गुंतवणूकदार शेअरबाजारातील सियान ॲग्रो इंडस्ट्रीज अँड इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीच्या मागे धावत असल्याचे दिसते. यामुळे शेअरबाजारातील मागील १३ सत्रांत कंपनीच्या व्यवहारांना अपर सर्किट लागले आहे.

शेअरबाजार हा कंपन्यांचे ऑर्डरबुक, ताळेबंद आणि कंपनीच्या उत्पादनांना किंवा व्यवसायाला असणारे भविष्य, कंपनीच्या प्रकल्पांचा संभाव्य विस्तार यावरच तेजीत चालू असतो. अनेकदा बाजार कोसळला तरी विशिष्ट कंपन्या दमदारपणे वाटचाल करत असतात. त्यामागे कंपन्यांकडील ऑर्डरबुक, भक्कम आर्थिक स्थिती, विस्ताराच्या योजना याचा त्यामागे हात असतो. जागतिक पातळीवरील तणावाची स्थिती, टॅरिफ वॉर, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची टोकाची धोरणे यामुळे गेल्या वर्षभरात शेअरबाजार सतत वरखाली होत राहिला.

अशा अनिश्चित आणि अस्थिर परिस्थितीतही गेल्या वर्षभरात गुंतवणूकदारांना तब्बल ५५१ टक्क्यांहून जास्त परतावा देणारी कंपनी म्हणजे सियान ॲग्रो इंडस्ट्रीज इन्फ्रा. सोमवारच्या (१ सप्टेंबर २०२५) सत्रातही या कंपनीच्या शेअरला अप्पर सर्किट लागले होते. शेअरबाजार सुरू असलेल्या मागील सलग १३ सत्रात कंपनीचा शेअर अप्पर सर्किटवर वाटचाल करत आहे. लोक या शेअरसाठी जीव टाकताना दिसत आहेत.

गंमतीचा भाग असा आहे, की एखाद्या गुंतवणूकदाराने ही कंपनी काय व्यवसाय करते, तिचा ताळेबंद काय सांगतो, कंपनीचे उत्पादन प्रकल्प किंवा सेवा केंद्रे कुठे आहेत हे पाहायचे म्हटले तर कंपनीचे संकेतस्थळ बंद पडलेले दिसते. मग प्रश्न असा आहे, की ज्या कंपनीचे संकेतस्थळही चालू नाही अशा कंपनीच्या मागे गुंतवणूकदार सैरावैरा का धावू लागले आहेत?

सियान ॲग्रो इंडस्ट्रीज इन्फ्रा लिमिटेड या कंपनीची स्थापना सप्टेंबर १९८५ मध्ये झाली. त्यावेळी तिचे नाव उमरेड ॲग्रो कॉम्प्लेक्स लिमिटेड असे होते. डिसेंबर २०१५ मध्ये कंपनीचे नाव बदलून सियान ॲग्रो इंडस्ट्रीज अँड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड असे करण्यात आले. ही कंपनी सोयाबीन आणि अन्य तेलबियांवर प्रक्रिया करून खाद्यतेलांचे मार्केटिंग आणि विक्री करते. त्याचबरोबर उपपदार्थ म्हणून पेंडविक्री (ऑइल केक) देशात आणि आंतरराष्ट्रीय बाजारात करते.



१९९० मध्ये कंपनीने सॉल्व्हंट एक्स्ट्रॅक्शन प्लँट आणि वनस्पती तेलाच्या उत्पादनाचा प्रकल्प चंद्रपूर जिल्ह्यात सुरू केला. कंपनी अमृतधारा या ब्रँडखाली सोयाबीन तेल आणि यश ब्रँडखाली करडई तेलाचे उत्पादन आणि विक्री करते. त्याखेरीज तेल उत्पादनातील उपपदार्थ म्हणून पेंड विक्री करते. २०१७ नंतरच्या काळात पूर्ती ॲग्रोटेक, जयराम इन्फ्राव्हेंचर प्रा. लि., ज्युपिटर मेटर प्रॉडक्टस् प्रा. लि. अशा कंपन्या सियान ॲग्रो इंडस्ट्रीजमध्ये विलीन करण्यात आल्या. २०२० मध्ये नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा येथे कंपनीने डिटर्जंट उत्पादनाचा प्रकल्प सुरू केला. खाद्यतेल, पेंड, डिटर्जंट, मसाले अशा क्षेत्रांत काम करणार्या कंपनीच्या शेअरला अचानक एवढी मागणी का आली असावी आणि लोक त्या शेअरच्या मागे एवढे का धावत असावेत, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे.

मार्च २०२४ मध्ये संपलेल्या तिमाहीत कंपनीची वार्षिक उलाढाल जेमतेम १७ कोटी रुपये आणि निव्वळ नफा ५ कोटी रुपये होता. आता एक वर्षात असे काय घडले, की गुंतवणूकदारांना या कंपनीच्या व्यवसायाला उज्ज्वल भविष्य आणि प्रचंड नफा मिळणार असे वाटू लागले आहे? सोमवारी (१ सप्टेंबर) कंपनीच्या शेअरला सलग १३ व्या सत्रात अप्पर सर्किट लागले आहे. जुलै २०२४ मध्ये कंपनीच्या शेअरचा भाव अवघा ४० रुपये होता तर आताच्या म्हणजे २०२५च्या ऑगस्ट महिन्यातील कंपनीच्या शेअरचा भाव ३८५ रुपये होता. महिनाभरातच त्यात तब्बल १०० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ होऊन सोमवारी बाजार बंद होताना तो ७७३.३५ रुपयांवर होता. याचा अर्थ वर्षभरात शेअरचा भाव १९ पटीने वाढला. म्हणजे ज्याने गेल्या वर्षी १ लाख रुपये गुंतवले असतील त्याचे मूल्य आज १९ लाख झाले आहे. जून २०२५ मध्ये संपलेल्या तिमाहीत कंपनीच्या महसुलात तब्बल ५.७ पटीने वाढ होऊन तो ९९.८३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. जानेवारी २०२४ मध्ये ॲडव्हांटेज विदर्भ या नागपूरमध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सियान ॲग्रो इंडस्ट्रीजने चेन्नईत मुख्यालय असलेल्या रामचरण ग्रुपबरोबर इथेनॉल उत्पादनासाठीच्या सामंजस्य करारावर सह्या केल्या. सध्या उसापासून आणि तशाच पिकांपासून इथेनॉलचे उत्पादन केले जाते. सियान ॲग्रो आणि रामचरण समूह मात्र कच्चा माल म्हणून कार्बन डायऑक्साइडचा वापर करून इथेनॉलचे उत्पादन करणार असल्याचे सांगण्यात आले होते. त्यामुळे दीर्घकाळात प्रदूषण कमी होईल, असे सियान ॲग्रोचे म्हणणे आहे. अर्थात देशात इथेनॉलच्या इकोसिस्टीमचा विचार केला तर जवळपास ५०० डिस्टलरी असून त्यांची वार्षिक १८ अब्ज लिटर इथेनॉल उत्पादनाची क्षमता आहे.

# ४५ व्या वयातही दिसाल २५ सारखे तरणेबांड, आजच सुरू करा ५ कोरियन ड्रिंक्स ; सगळे विचारतील रहस्य

वाईट जीवनशैली आणि खाण्याच्या समस्यांमुळे, लोकांच्या चेहऱ्यावर खूप लहान वयातच डाग पडत आहेत. यामुळे बरेचदा आत्मविश्वास कमी होतो आणि त्यांच्या आयुष्यात निराशा येते. जर तुम्हालाही अशा समस्येचा सामना करावा लागत असेल तर आज आम्ही तुम्हाला त्या ५ कोरियन पदार्थांबद्दल सांगणार आहोत, ज्यांचे सेवन करून तुम्ही ४५ व्या वर्षीही २५ वर्षांसारखे तरुण राहू शकता.

कोरियन स्किन हा नेहमीच चर्चेचा विषय ठरला आहे. पण ती मिळविण्यासाठी आपण नक्की काय करू शकतो याबाबत ब्युटिशियन स्मिता कांबळे यांनी काही सोपे उपाय सांगितले आहेत. काही कोरियन ड्रिंक्स वा पदार्द आहेत जे सेवन केल्याने तुमची त्वचा अधिक चमकदार आणि तरूण राहते. तुम्ही चाळिशीनंतरही विशीचे दिसू शकते. असे कोणते पदार्थ आहेत जाणून घ्या

ग्रीन प्लम टी (माएसिल चा)


माएसिलचा हा हिरव्या कोरियन प्लम्सपासून बनवलेला एक तिखट चहा आहे जो मेसिल म्हणून ओळखला जातो. या प्लम्समध्ये सेंद्रिय आम्ल असतात जे शरीराला विषमुक्त करण्यास मदत करतात, जळजळ कमी करतात आणि शरीरात क्षारता आणतात. हे सर्व एकत्रितपणे त्वचेचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात. याला गोड आणि आंबट चव आहे. हे नैसर्गिक एंजाइमने समृद्ध आहे. ते प्यायल्याने चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी होतात आणि तुम्ही तरुण दिसता. ग्रीन टी अर्थात नोक्चा जेव्हा अँटीएजिंग पदार्थांचा विचार केला जातो तेव्हा कोरियामध्ये नोक्चा म्हणून ओळखला जाणारा ग्रीन टी तुमच्यासाठी उत्तम ठरतो. हे क्लासिक पेय अँटीऑक्सिडंट्सने भरलेले आहे जे फ्री रॅडिकल्स निष्क्रिय करण्यास आणि त्वचेचे नुकसान रोखण्यास मदत करते. ते सौम्य, कमी तापमानात आणि थोड्या काळासाठी तयार केले जाते, कोणत्याही कडूपणाशिवाय पोषक तत्वे टिकवून ठेवते. हे अतिशय शांतपणे आणि एक एक घोट घेत प्यावे ज्यामुळे उबदारपणाची भावना देईल आणि त्वचेला चमकदेखील देईल. राईस पंच अर्थात सिक्खे कोरियन लोकांना माहीत आहे की सौंदर्य केवळ बाहेरील काळजी घेतल्याने येत नाही, तर शरीराला अंतर्गत पोषण देणेदेखील आवश्यक आहे. यासाठी माल्टेड बार्ली आणि शिजवलेला भात मिसळून गोड तांदळाचा पंच म्हणजेच सिखे बनवा. हे एंजाइम आणि प्रोबायोटिक्सने समृद्ध आहे, जे पिण्याने शरीरावर चमक परत येते. ते पचायला सोपे आहे आणि तोंडात सौम्य गोडपणा येतो. बोरी चा तुम्ही




बोरी चा ही आइस्ड टी चा कोरियन आवृत्ती मानू शकता. त्यात कॅफिनदेखील नसते, म्हणून तुम्ही तो दिवसभरात कधीही पिऊ शकता. त्याच्या अँटिऑक्सिडंट आणि फायबर गुणधर्मांमुळे बोरी चा पचनसंस्था निरोगी ठेवतो, ज्यामुळे एजिंगचा वेग कमी होतो. हे करण्यासाठी भाजलेला बार्लीचा चहा गरम पाण्यात ५-१० मिनिटे भिजवा. नंतर तो थंड करा आणि फ्रीजमध्ये ठेवा. यानंतर, तुम्ही तो घोट घोट पिऊ शकता. ४० वर्षानंतरही दिसाल २० वर्षासारखे तरूण, ५ कोरियन टी तुमची त्वचा ठेवतील चमकदार आणि ॠश्रुेळपस मध आणि लिंबाचा चहा अर्थात युजा चा हवामान बदलल्यानंतर तुम्हाला सर्दी आणि खोकल्याचा त्रास होत असेल तेव्हा युजा चा हे तुमचे आवडते पेय बनू शकते. हे पातळ कापलेले युजा (युझूसारखे लिंबूवर्गीय फळ) मधात मिसळून बनवलेले मिश्रण आहे. हे मसालेदार-गोड मिश्रण केवळ स्वादिष्टच नाही तर व्हिटॅमिन सी आणि अँटी-इंफ्लेमेटरी फ्लेव्होनॉइड्सने देखील समृद्ध आहे. ते त्वचेला उजळ करण्यास आणि कोलेजन वाढविण्यास मदत करते, एक प्रथिने जे आपली त्वचा मजबूत आणि लवचिक ठेवण्यासाठी आवश्यक आहे. ते सेवन करण्यासाठी, एका कपमध्ये गरम पाण्यात एक चमचा युजा जाम मिसळा त्यानंतर, ते हळूहळू प्या.

## कविता

मीही होतो पँथर !
पँथरच्या पुढार्याने केलं
छू... जा मंतर
पण शिक्षणाला केलं नाही अंतर
नोकरी लागली तदनंतर
तरीही...
सामाजीक कार्यात राहीलो
निरंतर...
ऊपजीविकेसाठी कुणा पुढेही
झुकलो नाही
भडवेगीरी,दलालीही केली नाही
स्वाभिमानाने जगलो
निडरतेने वागलो
अजुनही तोच स्वाभिमान
घेऊन जगतो आहे
चळवळीत बेडरतेने
वागतो आहे
चळवळीतील भाडखाऊ दलाला
गांवा गावातील गल्ली बोळात
शहराच्या चौका-चौकात तर
पान टपरीपासुन हाटेलात
बघतो आहे
स्वाभिमान नसलेल्या
भाडखाऊ,दलालांना
शब्दास्त्राने टोकतो आहे
प्रस्थापितांच्या दावणीत
झेपावणार्या तरुणांना
रोकतो आहे आणि
त्यांच्यकडून केल्या जाणार्या
विनाकरणच्या बदनामीला
भोगतो आहे
अशा प्रकारची बदनामी
करणार्यां मुर्खांच्या
बुध्दीची कीव वाटते
पण..
समाजात पुढार्यांचा बुरखा पांघरुन
वावरातील ऊभ्या पिकात
बेशरमपणे
डोलणार्या कुल्डूची
व गाजर गवताचे हसु येते
का ? तर...
समाजात जसे प्रबोधानाचे
कार्यक्रम राबवून ही
फुले,शाहू,आंबेडकरांच्या
क्रांतीकारी विचाराने
समाजात क्रांतीकारी स्वाभिमान
रुजत नाही
जसे की...



वावरात
तन नाशक
फवारुनही
कुल्डू आणि
गांजर गवत
नष्ट होत नाही.
हे सारं खुले
आम चालणारं
माझ्या सारख्याला पहावत नाही
पण बरेच असे बुध्दीजीवी
अहेत की ते..हे सारं पाहुन
बहुतेच भाडखाऊ,दलालांच्या
प्रबोधान संकल्पीत बुरख्याखाली
पांघरलेल्या कार्यक्रमात
ऊदघाटक,वक्ता,प्रमुख मार्गदर्शक
म्हणुन सहभाग नोंदवतात
त्या निमीत्ताने त्याचेकडून
आपली पाठ थोपटून घेतात व
कार्यच्रमात त्याची पाठ थोपटतात
यातील एक जन ऊपजीविकेसाठी
तर दुसरा
प्रसिध्दीसाठी
एक-मेकांना धोपटतात
या कार्यक्रमाच्या शक्ती
पत्रप्रदर्शनाने
प्रस्थापीत राजकारणी
या भाडखाऊ,दलाललाना
राजकीय फायद्यासाठी चाचपडतात
आणि
राजसत्ता हडपडतात.
प्रस्थापितांच्या राजसत्तेपुढे
चळवळीतील बहुतेक सारे
भाडखाऊ,लुबडबुतात.
**********

संपादक-साप्ता.शोषित लोकलढ
संस्थापक-भारतीय संविधान
क्रांतीदल
प्रा.एस.पी.हिवाळे.
मो. नं. ९८५०४११३२३

# चिकन-मटणापेक्षा अधिक स्वादिष्ट लागते 'ही' शाकाहारी भाजी, विटामिन डी कमतरता करेल १००% पूर्ण

ज्यूस पिणे आरोग्यदायी असते, असे अनेकदा आपण ऐकलेच असेल. त्यामुळे अनेकदा आपण घरीच फळांचे ज्यूस बनवतो. कारण- बाहेरून पॅकिंग असणारे ज्यूस पिणे आपल्याला धोकादायक वाटते. पण, कदाचित पुढची ओळ वाचून तुम्हाला धक्का बसेल. कारण- मधुमेह तज्ज्ञ डॉक्टर भाग्येश कुलकर्णी यांनी अलीकडेच रणवीर इलाहाबादिया यांच्या पॉडकास्टवर सांगितले की, की ज्यूस आणि सॉफ्ट ड्रिंक्समध्ये कोणताही फरक नसतो. दोन्हीमध्ये साखरेचे प्रमाण जास्तच असते. घरगुती असो किंवा पॅकिंग ज्यूस पिणे हे मुळात साखरेचे थेट सेवन करण्यासारखे आहे.

ज्यूस आणि सॉफ्ट ड्रिंक्स दोन्हीही एकसमान असतात. दोघांमध्येही १५ चमचे साखर असते. त्यामुळे जर कोणी तुमच्यासमोर १५ चमचे साखर ठेवली, तर ती तुम्ही खाल का? नाही ना; मग पुढच्या वेळी जेव्हा तुमच्यासमोर ज्यूस आणि सॉफ्ट ड्रिंक्स येतील तेव्हा तुम्ही डोक्यात ठेवा की, आता तुमच्या शरीरात १५ चमचे साखर जाणार आहे.

घरगुती आणि पॅकिंग असणाऱ्या ज्यूसमधील फरक स्पष्ट करताना डॉक्टर कुलकर्णी म्हणाले की, घरी बनवलेला ज्यूस कदाचित तुमच्या शरीराचे थोडे



कमी नुकसान होईल. पण, पॅकेज केलेल्या ज्यूसमुळे १०० टक्के नुकसान होऊ शकते. पॅकेज ज्यूसची चव गोड करण्यासाठी त्यात साखर टाकलेली असते. पण, त्याचबरोबर त्यात प्रिझर्वेटिव्ह्ज (संरक्षक रसायनं)देखील घातलेली असतात. ही रसायने ज्यूस खराब होऊ नये म्हणून टाकली जातात;पण, शरीरासाठी ती अजिबात चांगली नसतात.

ज्यूसपेक्षा आणि सॉफ्ट ड्रिंक्स हानिकारक आहेत का हे स्पष्ट करण्यासाठी द इंडियन एक्स्प्रेसने तज्ज्ञांशी चर्चा केली. बंगळुरू येथील एस्टर सीएमआय हॉस्पिटलच्या क्लिनिकल न्यूट्रिशन अँड डायटेटिक्सच्या सर्व्हिसेस प्रमुख एडविना डॉक्टर राज कुलकर्णी दाव्याशी पूर्णपणे सहमत नव्हत्या. त्यांच्या मते, या प्रश्नाचे उत्तर हो किंवा नाही, असे देता येणार नाही. सॉफ्ट ड्रिंक्समध्ये कोणतेही पोषण नसते. त्यातून कोणतीही जीवनसत्त्वे किंवा खनिजांशिवाय फक्त कॅलरीज मिळतात. दुसरीकडे फळांचा रस हा फळांपासून बनवला जातो आणि त्यात जीवनसत्त्वे, खनिजे व अँटिऑक्सिडंट्ससह नैसर्गिक साखर असते. ही पोषक तत्त्वे आरोग्यासाठी चांगले असतात. डॉक्टर राज कुलकर्णी यांनी ज्यूस कमी प्रमाणात पिण्याची शिफारस केली आहे. एक छोटा ग्लास ताजा, साखर न घातलेल्या ज्यूस किंवा अनस्ट्रेन्ड स्मूदी पिणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरते. कारण- त्यात गर टिकून राहतो. त्यामुळे आपण त्याला आरोग्यदायी मानू शकतो. पण, त्यांचे असेही म्हणणे आहे की, फक्त तुम्ही फळ खाल्लं, तर पोट जास्त वेळ भरलेलं वाटतं आणि त्यातून फायबर जास्त प्रमाणात मिळते. तसेच फळातील साखर हळूहळू शोषली जाते.

त्यामळे ज्यूस खरेदी करतानाही पॅक केलेले किंवा प्रिझर्वेटिव्ह्ज ज्यूस घेणे टाळा. तसेच जर प्यायचंच असेल, तर दिवसाला एक छोटा ग्लास ज्यूस पुरेसा आहे. त्याच्याबरोबर भरपूर पाणी प्या आणि शक्य असल्यास एक फळ खा. अशा प्रकारे तुम्हाला साखरेचा अतिरेक न होता फळांचे फायदे मिळतील.

घरगुती फळांच्या रसामुळे तुमच्या शरीराचे कमी नुकसान होते. पण, पॅकिंग रस नेहमीच तुमचे नुकसान करतील. त्यामुळे किती प्रमाणात साखरेचे सेवन केले त्याचा मागोवा घेणे आवश्यक आहे. कारण- कोणत्याही स्वरूपात १५ चमचे साखरेचे सेवन केल्याने तुमच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो.

# जेवणात करा झणझणीत बेत! ५ मिनिटांमध्ये झटपट बनवा टोमॅटो ठेचा, नोट करून घ्या रेसिपी




पावसाळ्याच्या दिवसांमध्ये सगळ्यांचं जेवणाच्या ताटात काहींना काही झणझणीत पदार्थ हवा असतो. कधी जेवणात तिखट भाजी बनवली जात तर कधी मसालेदार तिखट आमटी बनवली जाते. पण नेहमीच तेच पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये टोमॅटोचा ठेचा बनवू शकता. याआधी तुम्ही मिरचीचा ठेचा, शेंगदाण्याचा ठेचा किंवा लसूण ठेचा खाल्ला असेल. कोल्हापुरी चवीचा ठेचा जेवणात असेल तर चार घास जेवण जास्त जाईल. टोमॅटोचा ठेचा आठवडाभर व्यवस्थित टिकून राहतो. गरमागरम भाकरी किंवा चपातीसोबत ठेचा अतिशय सुंदर लागेल. तोंडाची चव बदलण्यासाठी तुम्ही टोमॅटो ठेचा बनवू शकता. जेवणातील सर्वच पदार्थ बनवताना टोमॅटोचा वापर केला जातो. यामुळे जेवणाची चव वाढते आणि आरोग्याला सुद्धा अनेक फायदे होतात. चला तर जाणून घेऊया टोमॅटो ठेचा बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
टोमॅटो
हिरव्या मिरच्या
लसूण
मीठ
तेल
जिरं

लहान मुलांच्या डब्यासाठी १० मिनिटांमध्ये झटपट बनवा कुरकुरीत बेसन भेंडी फ्राय, चवीला लागेल मस्त

कृती:

टोमॅटो ठेचा बनवण्यासाठी सर्वप्रथम, टोमॅटो स्वच्छ धुवून दोन तुकडे करा.

तवा गरम करून त्यावर तेल टाका. गरम तेलात टोमॅटो टाकून व्यवस्थित भाजून घ्या. त्यानंतर त्यात हिरव्या मिरच्या टाका.

दोन्ही पदार्थ व्यवस्थित भाजल्यानंतर टोमॅटोची साल काढून घ्या. त्यानंतर त्यात लसूण पाकळ्या टाका.

सर्व साहित्य व्यवस्थित भाजून झाल्यानंतर खलबत्यामध्ये टाकून सर्व पदार्थ मिक्स करा. त्यानंतर त्यात चवीनुसार मीठ आणि जिरं टाकून मिक्स करा.

ठेचा व्यवस्थित बारीक करून झाल्यानंतर वाटीमध्ये काढून व्यवस्थित मिक्स करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला टोमॅटोचा ठेचा. हा पदार्थ गरमागरम भाकरीसोबत सुंदर लागेल.

# पोटातून सतत गुडगुड आवाज येतो? शरीरसंबंधित असू शकतो 'या' गंभीर आजाराचा धोका, वेळीच घ्या डॉक्टरांचा सल्ला

चुकीची जीवनशैली, कामाचा वाढलेला तणाव, आहारात होणारे बदल, जंक फूडचे अतिसेवन, मानसिक तणाव, अपुरी झोप इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम हळूहळू आरोग्यावर दिसू लागल्यानंतर शरीरात अनेक बदल होऊ लागतात. तर कधी रात्रीच्या जेवणात किंवा दुपारच्या जेवणात मसालेदार आणि तेलकट पदार्थ खाल्ल्यानंतर पोटात ऍसिडिटी वाढण्याची शक्यता असते. ऍसिडिटी, अपचन, पोट फुगणे किंवा इतरही समस्या उद्भवू लागतात. तसेच बऱ्याचदा पोटातून गुडगुड आवाज येऊ लागतो. अनेक लोक पोटातून आवाज येण्याच्या समस्येला अतिशय सामान्य समजतात. मात्र हा आवाज वारंवार येत असल्यास दुर्लक्ष न करता डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते औषध उपचार करणे आवश्यक आहे.

वारंवार पोटातून गुडगुड आवाज येण्याला मेडिकल भाषेत स्टोमक ग्रोलिंग असे म्हणतात. शरीराची पचनक्रिया सुरु होते तेव्हा पोट आणि आतड्यांमधून गुडगुड आवाज येऊ लागतो. पोटातून हा आवाज एकदा किंवा दोनदा येणे अतिशय सामान्य आहे पण वारंवार पोटातून गुडगुडण्याचा आवाज येत असेल तर डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते उपचार करणे आवश्यक आहे. ही लक्षणे आरोग्यासंबंधित गंभीर आजाराचे संकेत देतात.

जेवलेले अन्नपदार्थ पचन होण्यासाठी छोट्या आतड्यांमध्ये पोहचतात तेव्हा तेव्हा शरीर अन्न तोडण्यासाठी आणि त्यातील न्यूट्रिएंट्स अ‍ॅब्जॉर्ब करण्यासाठी डायजेस्टिव एंजाइम्स रिलीज करतात. ही प्रक्रिया भूक लागल्यानंतर होते. भूक लागल्यानंतर सुद्धा पोटातून गुडगुड आवाज येऊ लागतो. हा आवाज अनेक प्रयत्न करून सुद्धा थांबत नसेल तर वेळीच डॉक्टरांचा सल्ला घ्या. पचनसंबंधित समस्या उद्भवू लागल्यानंतर शरीरात अनेक बदल होतात. या बदलांकडे दुर्लक्ष केल्यास शरीराला हानी पोहचते.

पोटातील गुडगुड आवाज थांबवण्यासाठी



उपाय:

पोटातून सतत गुडगुड आवाज येत असेल तर जास्तीत जास्त पाणी प्यावे. पाणी प्यायल्यामुळे पचनक्रिया सुधारते. तसेच पाण्याचे सेवन केल्यानंतर थोड्या वेळाने जेवण करावे. पोटातील गुडगुड आवाज थांबवण्यासाठी दिवसातून दोनदा हर्बल चहाचे सेवन करावे. हर्बल चहा आरोग्यासाठी अतिशय प्रभावी असतो. हा उपाय नियमित केल्यास पोटातील आवाज थांबेल आणि शरीराला अनेक फायदे होतील.

(संबंधित प्रश्न)

पोटाचा गडगडाट म्हणजे काय?

पोटाचा गडगडाट म्हणजे भूक लागल्यास किंवा अन्न पचनाच्या प्रक्रियेदरम्यान आतड्यांमध्ये होणारे आवाज आहेत. हे सामान्य आहे, पण कधीकधी ते विशिष्ट आरोग्य समस्यांमुळे देखील होऊ शकतात.हे आवाज अनेकदा गॅस आणि द्रव्यांच्या हालचालीमुळे होतात. आतड्यांमध्ये अन्न आणि वायूंच्या हालचालीमुळे हे आवाज निर्माण होतात. पोटाचा गडगडाट होण्याची कारणे:

जेव्हा पोट रिकामे असते, तेव्हा आतड्यांमध्ये स्नायूंची हालचाल वाढते आणि त्यामुळे आवाज येतात. अन्न पचनाच्या प्रक्रियेदरम्यान, आतड्यांमधून अन्न आणि वायू पुढे सरकतात, ज्यामुळे आवाज येतात.

पोटाचा गडगडाट कमी करण्याचे उपाय?

थोड्या थोड्या वेळाने नियमितपणे जेवल्याने पोटाचा गडगडाट कमी होऊ शकतो. पुरेसे पाणी प्यायल्याने पचनक्रिया सुधारते आणि वायू कमी होतो. हळू हळू आणि शांतपणे खाल्ल्याने अन्न व्यवस्थित पचते आणि वायू कमी तयार होतो.

# वाढत्या ब्लड प्रेशरवर रामबाण उपाय ठरते ही फेमस जपानी ट्रिक; रोज हीचा वापर कराल तर आयुष्यभर कंट्रोलमध्ये राहेल BP

आजच्या वेगवान जीवनशैलीत हाय ब्लड प्रेशर (उच्च रक्तदाब) ही एक सामान्य पण धोकादायक समस्या बनली आहे. वाढलेला रक्तदाब हळूहळू हृदय, मूत्रपिंड आणि मेंदूवर परिणाम करतो. यामुळे हृदयविकार, स्ट्रोक आणि इतर आरोग्य समस्यांचा धोका वाढतो. म्हणूनच याला सायलेंट किलर असेही म्हटले जाते. औषधोपचाराबरोबरच आपण आपल्या जीवनशैलीत काही महत्त्वाचे बदल करणेही तेवढेच आवश्यक आहे. याच संदर्भात जपानमध्ये विकसित झालेली एक खास पद्धत फार चर्चेत आहे. तुम्ही जर या पद्धतीचा आपल्या जीवनशैलीत समावेश केला तर तुमचे ब्लड प्रेशर कधीही वाढणार नाही आणि याच्या नियमित जीवनात या ट्रिकचा समावेश केल्याने तुमचे दैनंदिन आरोग्यही निरोगी होण्यास मदत होईल.

पावसात केस सतत भिजून कोरडे आणि रुक्ष झाले आहेत? 'या' टिप्स फॉलो करून घ्या केसांची काळजी, दिसतील अधिक सुंदर



काय आहे ही जपानी ट्रिक?

जपानी संशोधकांनी इंटरव्हल वॉकिंग ट्रेनिंग नावाची तंत्र विकसित केली आहे. यामुळे रक्तदाबावर नियंत्रण मिळवता येते. हा एक व्यायामाचा प्रकार आहे ज्यात हळू किंवा जलद चालले जाते.

इंटरव्हल वॉकिंग म्हणजे काय?

सन २००७ मध्ये प्रा. हिरोशी नोसे आणि शिजुए मासुकी यांनी ही पद्धत विकसित केली. या तंत्रात चालण्याला दोन टप्प्यांत विभागले जाते:

जलद चालणे – सुमारे ३ मिनिटे वेगाने चालावे, ज्यामुळे श्वास वेगवान होतो आणि हृदयाचे ठोके वाढतात.

मंद गतीने चालणे – पुढील ३ मिनिटे आरामात हळूहळू चालावे.

हा क्रम सलग पाच वेळा पुन्हा केल्यास सुमारे ३० मिनिटांची वॉकिंग होते, ज्यात १५ मिनिटे वेगवान आणि १५ मिनिटे मंद गतीत चालणे असते.

जपानी ट्रिकने रक्तदाब कसा नियंत्रित करायचा?

संशोधनानुसार, या प्रकारे चालल्यास रक्तवाहिन्यांची क्रियाशीलता वाढते आणि रक्तप्रवाह सुधारतो. नियमित इंटरव्हल वॉकिंगमुळे सिस्टोलिक बीपी सुमारे ९ ााक्स तर डायस्टोलिक बीपी सुमारे ५ ााक्स ने कमी होऊ शकतो. तसेच शरीराची ऑक्सिजन घेण्याची क्षमता वाढते, जी उच्च रक्तदाब असलेल्या लोकांसाठी विशेषतः फायदेशीर ठरते.

इतर फायदे फुफ्फुसांची क्षमता सुधारते.

पाय मजबूत होतात व दैनंदिन कामे सहज पार पाडता येतात.

रक्तातील साखर नियंत्रित राहते, त्यामुळे टाइप-२ डायबिटीस असणाऱ्यांसाठी उपयुक्त.

मन प्रसन्न राहते, चांगली झोप लागते आणि ताणतणाव कमी होतो.

सुरुवात कशी करावी?

प्रथम टप्प्यात १ मिनिट वेगाने आणि ३ मिनिटे हळूहळू चालणे सुरू करा.

हळूहळू ३ मिनिटे जलद + ३ मिनिटे मंद या पद्धतीपर्यंत वाढवा.

चालताना पाठ सरळ ठेवा आणि नजर नेहमी समोर ठेवा.

सुरुवातीला तज्ञ व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली ही पद्धत अवलंबावी.

थरज्ञश णाएरीश्रू ढळींि: सकाळी लवकर उठणे जीवावर येते? 'हा' सोपा उपाय नक्कीच तुमचे आयुष्य बदलेल

F-Qs (संबंधित प्रश्न)

इंटरवल वॉकिंगसाठी काही टिप्स काय आहेत?

टायमर वापरा, तुमच्या शरीराचे ऐका, सातत्यपूर्ण रहा, हळूहळू याची सुरुवात करा. कोणीही इंटरवल वॉकिंग करू शकतो का?

होय, इंटरवल वॉकिंग ही पद्धत सर्व वयोगटाच्या लोकांसाठी फायद्याची आहे.

# राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेत लातूरचा मल्हार माने सुवर्णपदक विजेता

लातूर :- तामिळनाडू राज्यातील चेन्नई येथील नेहरू इंडोर स्टेडियममध्ये २७ ते ३१ ऑगस्ट २०२५ दरम्यान पार पडलेल्या राष्ट्रीय किकबॉक्सिंग चिल्ड्रन अँड कॅडेट चॅम्पियनशिप स्पर्धेत लातूरचा खेळाडू मल्हार बालाजी माने (वय ८ वर्ष) याने आपल्या दमदार खेळीसह महाराष्ट्राचा झेंडा उंचावत सुवर्णपदकाची कमाई केली. लातूर येथील इन्व्हिन्सिबल मार्शल आर्टस् चा विद्यार्थी असलेल्या मल्हार मानेने १८ किलो वजनी गटातील लाईट कॉन्टॅक्ट प्रकारात सुवर्ण पदक जिंकले. या यशामुळे लातूर जिल्ह्याचा तसेच महाराष्ट्र राज्याचा नावलौकिक देशभर गाजला. या कामगिरीमागे मुख्य प्रशिक्षक शुभम सोनवणे ( लातूर जिल्हा किकबॉक्सिंग एसोसिएशन उपाध्यक्ष) व सहायक प्रशिक्षक शेख अली यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच लातूर किकबॉक्सिंग असोसिएशनचे सचिव वासिम सय्यद सर यांचे विशेष सहकार्य लाभले. दरम्यान, या स्पर्धेत महाराष्ट्राने एकूण ४८ सुवर्ण, ३९ रौप्य आणि ६७ कांस्य अशी १५४ पदके जिंकून देशात प्रथम क्रमांक पटकावला.







# आकाश सिंगारे यांचे सेट-नेट मध्ये घवघवीत यश

लातूर: येथील लातूर रहिवाशी असलेल्या आकाश संजीव सिंगारे याने एम एच सीईटी आणि एनटीएच्या वतीने घेण्यात आलेल्या सीएसआयआर नेट परीक्षेत घवघवीत यश मिळविले असून त्याचा जीआरएफ रँक १०७ असा आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे.



आकाश यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील भौतिक आणि रसायनशास्त्र (फिजीकल केमिस्ट्री) या शाखेतून पदव्यूत्तर शिक्षण घेतले असून हे यश त्याच्या कठोर परिश्रम, प्रखर बुद्धिमत्ता आणि शैक्षणिक निष्ठेचे द्योतक असून विद्यापीठ नादेड येथील रसायनशास्त्र संकुलासाठी ही बाब अभिमानाची ठरली आहे. एमएचटी सेट परीक्षेत आकाशने यश संपादन केले आहे. या यशामुळे आकाश संजीव सिंगारे यांना पीएच. डी. संशोधनासाठी संशोधन फेलोशिपची संधी उपलब्ध होणार आहे.

# लवकरच एनआयए न्यायालय स्थापन करा नाहीतर .. ; सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला असे निर्देश का दिले ?

सर्वोच्च न्यायालयाने एनआयए न्यायालये स्थापन करण्यात होणाऱ्या विलंबाबद्दल नाराजी व्यक्त केली. विशेष न्यायालये स्थापन करण्यात अपयशी ठरल्यामुळे, कट्टर गुन्हेगार खटल्यांना विलंब करून व्यवस्थेला हायजॅक करण्याचा प्रयत्न करतात असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाने म्हटले आहे की,भयानक गुन्हेगार न्यायव्यवस्थेचा गैरवापर करण्याचा प्रयत्न करतात आणि न्यायालयांना जामीन देण्यास भाग पाडतात



न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांचे खंडपीठ एका माओवादी समर्थकाच्या याचिकेवर सुनावणी करत होते. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (एएसजी) ऐश्वर्या भाटी यांनी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, केंद्र समर्पित एनआयए न्यायालये स्थापन करण्यासाठी राज्यांशी सल्लामसलत करत आहे, ज्यावर न्यायालयाने न्यायालये स्थापन करण्यात होणाऱ्या विलंबाबद्दल नाराजी व्यक्त केली.

एएसजी ऐश्वर्या भाटी यांनी न्यायालयाला सांगितले की या संदर्भात लवकरच निर्णय घेतला जाईल. न्यायालयाने केंद्राला सांगितले की, जघन्य गुन्ह्यांमधील खटले वेळेवर पूर्ण केल्याने समाजाला एक चांगला संदेश जाईल कारण कट्टर गुन्हेगारांना वाटते की ते व्यवस्थेला हायजॅक करू शकतात. खंडपीठाने म्हटले, 'ही तुमच्यासाठी प्रोत्साहन देण्याची संधी आहे कधीकधी हे कट्टर गुन्हेगार संपूर्ण न्यायव्यवस्थेचा ताबा घेतात आणि खटला पूर्ण होऊ देत नाहीत, परिणामी न्यायालयांना विलंबाच्या आधारावर त्यांना जामीन देण्यास भाग पाडले जाते.' एएसजी ऐश्वर्या भाटी म्हणाले की, अशी न्यायालये स्थापन करण्याचा अधिकार राज्यांना आहे यावर सहमती दर्शवावी लागते. न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले की, केंद्राला फक्त आवश्यक बजेट वाटप आणि उच्च न्यायालयांची संमती आवश्यक आहे, तर राज्य सरकारांची भूमिका नंतर विचारात घेता येईल. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी १४ ऑक्टोबरपर्यंत तहकूब केली. १८ जुलै रोजी, सर्वोच्च न्यायालयाने विशेष कायद्यांशी संबंधित प्रकरणांसाठी न्यायालये स्थापन न केल्याबद्दल केंद्र आणि महाराष्ट्र सरकारला फटकारले होते, कारण न्यायालयांना आरोपींना जामीन देण्यास भाग पाडले जाईल.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, जर अधिकारी एनआयए कायदा आणि इतर विशेष कायद्यांअंतर्गत जलद खटल्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांसह न्यायालये स्थापन करण्यात अयशस्वी झाले तर न्यायालयाला आरोपींना जामिनावर सोडण्यास भाग पाडले जाईल, कारण खटला वेळेवर पूर्ण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा नाही.

खंडपीठाने महाराष्ट्र सरकारला सांगितले की, विद्यमान न्यायालयांना विशेष न्यायालये म्हणून नाव देणे म्हणजे उच्च न्यायालयाला त्यांची नावे बदलण्यास भाग पाडण्यासारखे आहे. महाराष्ट्रातील गडचिरोली येथील नक्षलवादी समर्थक कैलाश रामचंदानी यांच्या जामीन अर्जावर सर्वोच्च न्यायालयाने हा आदेश दिला. २०१९ मध्ये आयईडी स्फोटात राज्य पोलिसांच्या क्विक रिस्पॉन्स टीममधील १५ पोलिसांचा मृत्यू झाल्यानंतर रामचंदानी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाने १७ मार्चचा आपला मागील आदेश मागे घेतला, ज्यामध्ये खटल्यात जास्त विलंब झाल्याच्या कारणावरून त्यांचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला होता. न्यायालयाने म्हटले की, जर केंद्र आणि राज्य सरकारे एनआयएच्या खटल्यांच्या सुनावणीसाठी विशेष न्यायालये स्थापन करण्यात अपयशी ठरली तर त्यांच्या मदत याचिकेवर विचार केला जाईल.

# मिस्टर अजित पवार कुठे गेला तुमचा डिसिप्लिन ? त्या व्हिडीओवरून राऊतांचा घणाघात

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महिला पोलीस अधिकाऱ्याला फोनवरून झापल्यानंतर त्यावर आता विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. संबंधित महिला अधिकाऱ्याला अजित पवार यांनी फोनवरून तुमच्यावर ॲक्शन घेईन अशा शब्दांत थेट धमकीच दिली आहे. अजित पवार आणि संबंधित महिला अधिकाऱ्याच्या संवादाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. आता याच मुद्यावरून ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी अजित पवार यांच्यावर जहरी टीका केली आहे.



राज्याचा उपमुख्यमंत्री असलेला माणूस आयपीएस अधिकाऱ्याला बेकायेदशीर कामांना पाठिंबा द्या म्हणून सांगतोय, मी सांगतोय ते बेकायदेशीर काम कर असे ते सांगताहेत. आणि हेच अजित पवार इतरांना कायदा शिकवात, मग तुम्ही काय करता? असा खडा सवाल राऊतांनी अजित पवारांना विचारला आहे. तुम्ही सगळे चोरांचे सरदार आहात अशी जहरी टाकाही राऊतांनी केली आहे. तुम्ही महाराष्ट्र राज्य हे चोरांचं राज्य केलं आहे, महाराष्ट्राच्या उत्तम प्रशासनाला तुम्ही भ्रष्टाचाराची कीड लावताय. दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी अर्धा महाराष्ट्र लुटला असा घणाघातही राऊतांनी केला आहे.

मिस्टर अजित पवार कुठे गेला तुमचा डिसिप्लिन? तसेच मी बेशिस्त खपवून घेणार नाही असं ते म्हणतात, मग आता काय झालं ? एका आयपीएस अधिकाऱ्याला तुम्ही दम देता, तेही तुमच्या पक्षातील चोरांना संरक्षण देण्यासाठी? मिस्टर अजित पवार कुठे गेला तुमचा डिसिप्लिन? असा खडा सवाल राऊतांनी अजित पवारांनी विचारला आहे.

नैतिकदृष्ट्या सरकारमध्ये राहण्याचा अधिकारच नाही तसेच संजय राऊतांनी अजित पवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. डिसिप्लिन, शिस्त कोणासाठी मग? हे प्रकरण समोर आल्यावर अजित पवारांना नैतिकदृष्ट्या सरकारमध्ये राहण्याचा अधिकारच नाही. या आधी नैतिकतेच्या मुद्यावर अनेकांना राजीनामे द्यावे लागले आहेत, असं राऊत म्हणाले आहेत.

# नमो दिव्यांग जिल्हा पुनर्वसन केंद्रात गणरायाची महाआरती





लातूर /प्रतिनिधी :- लातूर येथील नमो दिव्यांग जिल्हा पुनर्वसन केंद्र, उमंग इन्स्टिट्यूट ऑफ ऑटिझम अँड मल्टी-डिसॅबिलिटी रिसर्च सेंटर येथे गणेशोत्सवानिमित्त भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले. या आरतीचा मान जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्री. राजू गायकवाड यांच्या हस्ते संपन्न झाला. या प्रसंगी उमंग सेंटरचे सचिव श्री. किरण उटगे, डॉ. श्रीशैल्यम तलारी, श्री. गणेश डोंगरे, डॉ. अर्जुन राठोड, डॉ. मंदिरा हौसले, डॉ. वैष्णवी सिंगन, डॉ. प्रवीण राठोड, सेंटरचे व्यवस्थापक ड. श्रीहरी गोरे तसेच रामेश्वर जाधव, विवेक हानवते, हरीश पाटील यांच्यासह केंद्रातील कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी दिव्यांग विद्यार्थी व त्यांचे पालक गणेश आरतीत सहभागी झाले. अध्यात्मिक वातावरणात झालेल्या या महाआरतीत सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत गणरायाचे दर्शन घेतले.

# पंतप्रधान मोदींशी युरोपियन युनियनच्या नेत्यांची फोनवर चर्चा ; फोटो व्हायरल, अमेरिकेला मोठा इशारा

भारत आणि युरोपियन युनियन बहुप्रतिक्षित मुक्त व्यापार करार लवकरात लवकर अंतिम करण्यासाठी चर्चा करत आहेत. काल, युरोपियन युनियनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन आणि युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँटोनियो कोस्टा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवर दीर्घ चर्चा केली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक शुल्क धोरण आणि विघटनकारी व्यापार धोरणांमध्ये, भारत, युरोपियन युनियन आणि युरोपियन कौन्सिलच्या नेत्यांनी कायद्याचे पालन करणारे जग निर्माण करण्याचा संकल्प केला. या बैठकीत, भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार करार लवकर पूर्ण करण्याव्यतिरिक्त, भारत मध्य पूर्व युरोप आर्थिक कॉरिडॉरची अंमलबजावणी आणि युक्रेन युद्ध लवकर संपवण्यावर चर्चा झाली. या बैठकी व्यतिरिक्त, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी युक्रेनचे परराष्ट्र मंत्री अँड्री स्बिहा यांच्याशीही चर्चा केली. जयशंकर यांनी याविषयी बोलताना, भारत युक्रेन संघर्ष लवकर संपवून कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित करण्याच्या बाजूने आहे असे म्हटले आहे. पंतप्रधान मोदी आणि युरोपियन युनियन नेत्यांचा संयुक्त फोन कॉल भारत युरोपसोबत मुक्त व्यापार करार (FT-) अंतिम करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. गुरुवारी युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष कोस्टा आणि युरोपियन कमिशनचे प्रमुख वॉन डेर लेयन यांच्याशी झालेल्या संयुक्त फोन कॉलमध्ये, पंतप्रधान मोदींनी युक्रेन संघर्षाचे शांततापूर्ण निराकरण आणि शांतता आणि स्थिरता लवकर पुनर्संचयित करण्यासाठी भारताच्या सतत समर्थनाचा पुनरुच्चार केला. या कॉल दरम्यान जागतिक राजकारण, संघर्ष आणि आर्थिक हितसंबंधांवर चर्चा झाली.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संवाद साधणाऱ्या युरोपातील आघाडीच्या संघटनांचा हा एकत्रित असणार फोटो अमेरिकेसाठी एक मोठा इशारा मानला जात आहे. भारताने जारी केलेल्या एका प्रसिद्धीपत्रकात, जागतिक समस्यांना एकत्रितपणे संबोधित करण्यात, स्थिरतेला प्रोत्साहन देण्यात आणि परस्पर समृद्धीसाठी नियमांवर आधारित जागतिक व्यवस्थेला प्रोत्साहन देण्यात भारत-युरोपियन युनियन धोरणात्मक भागीदारीची भूमिका नेत्यांनी अधोरेखित केली. ट्रम्प प्रशासनाने भारतीय वस्तूंवर लादलेल्या ५० टक्के कर आकारणीचा परिणाम कमी करण्याचा भारत प्रयत्न करत असताना तिन्ही नेत्यांमधील फोन संभाषण झाले असे दिसून येत आहे. भारतात पुढील शिखर परिषद एण तीन नेत्यांनी पुढील भारत-ईयू शिखर परिषद भारतात परस्पर सोयीस्कर वेळी आयोजित करण्यावरही चर्चा केली आणि पंतप्रधान मोदींनी कोस्टा आणि व्हॉन डेर लेयन यांना उपस्थित राहण्याचे आमंत्रण दिले.

# गुंठेवारीवरील बंदी कायमस्वरूपी उठवून प्रकरणे तात्काळ निकाली काढा - इंजिनिअर्स असो. लातूरचे पालिका आयुक्तांना निवेदन

लातूर : लातूर शहर हद्दीतील प्लॉटच्या गुंठेवारी करणे बंद असल्याचे महानगरपालिका नगररचना विभागाकडून कळविण्यात आले आहे. यामुळे सद्या प्लॉट खरेदी, विक्री, बांधकाम परवाने बंद आहेत यामुळे गुंठेवारीस मुदतवाढ देण्यात यावी, दीडशे ते तीनशे चौरस मीटरपर्यंतच्या घर बांधकामांना खाजगी अभियंत्यांच्या मंजुरीवर परवानगी देण्यात यावी अशी मागणी इंजिनिअर्स असोसिएशन लातूरच्या वतीने महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे करण्यात आली आहे.



याबाबत लातूर जिल्हा इंजिनिअर्स असोसिएशनच्या वतीने निवेदनात नमूद करण्यात आले आहे की लातूरचे जिल्हाधिकारी कार्यालय जा.क्र.२०२४/महसुल / गुंठेवारी/जमा-१/डेस्क-५/कावी-३४४ दिनांक १४/०२/२०२४ रोजीच्या आदेशानुसार आपल्या कार्यालयाकडून यावर अंमलबजावणी होणे आवश्यक होते, याबाबत असोसिएशनच्या वतीने आपल्या कार्यालयास दि. १४/ मार्च २०२४ रोजी निवेदन देऊन गुंठेवारी सुरू करण्यासाठी विनंती करण्यात आली होती मात्र अद्यापपर्यंत गुंठेवारीचे काम सुरू नाही. नगर रचनाकार यांच्या हलगर्जीपणामुळे शहरामधील प्लॉटची खरेदी, विक्री करणे व बांधकाम परवानगी यास खिळ बसली आहे. यामुळे सर्वसामान्य लातूरकरांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे महानगरपालिका आयुक्त यांनी गुंठवारीवरील बंदी उठवावी दीडशे ते तीनशे चौरस मीटरपर्यंतच्या घर बांधकामांना खाजगी अभियंत्यांच्या मंजुरीवर परवानगी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असून याला जिल्ह्यातील सर्व इंजिनिअर्सनी पाठिंबा दर्शविला आहे. यावेळी लातूर जिल्हा इंजिनिअर्स असो.चे अध्यक्ष अभिजीत देशपांडे सरसंबेकर,तय्यब सय्यद, वसीम शेख मनोज देशमुख,अहमद मुल्ला,ऋषिकेश निगडीकर,रिजवान गडीवाले उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE